जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, श्री. अनिल दुर्गानंद झा (विक्रेते) यांनी कायमस्वरूपी पर्यायी निवास व्यवस्था म्हणून द वरळी शिव शाही को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड **(सोसायटी)** च्या इमारत क्र. ७ मधील क्र. ५ धारक त्यांच्या जुन्या फ्लॅट **(जुने परिसर)** च्या बदल्यात त्यांना वाटप करण्यात आलेल्या पुनर्वसन इमारत टॉवर ए मधील फ्लॅट/अपार्टमेंट क्र. १३०४ **(फ्लॅट / अपार्टमेंट)** त्यासह त्यावरील आनुषांगिक शेअर्स जे येथे खालील लिखित **परिशिष्टात** अधिक तपशीलवारपणे वर्णिलेले आहेत त्यामधील त्यांचे सर्व मालकी, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आमच्या अशीलांच्या नावे विकण्याचे आणि हस्तांतरित करण्याचे मंजूर केले आहे.

सदर सोसायटीने त्यांच्या जमिनीच्या विकासाकरिता मुंबई येथील हमी उप-प्रबंधकांच्या कार्यालयात अनु क्र. बीबीई३-५३०४ सन २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रेस्टीज फाल्कॉन मुंबई रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासह दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या विकास करारात भाग घेतला आहे. त्या दृष्टीने सदर फ्लॅट/अपार्टमेंटच्या बदल्यात कायमस्वरूपी पर्यायी निवास व्यवस्था म्हणून नवीन फ्लॅट/अपार्टमेंट जे १०२५ चौ. फू. चटई क्षेत्रापेक्षा कमी नाही तो वाटप केला जाईल आणि त्यानुसार पुनर्वसन इमारत टॉवर ए साठी मंजुरीत लेआऊट प्लॅनच्या अधिन फ्लॅट/अपार्टमेंट क्रमांकामध्ये बदल होऊ शकतो.

सर्व व्यक्तींना येथे खालील लिखित परिशिष्टात नमूद केलेला फ्लॅट/अपार्टमेंट किंवा त्यावरील आनुषांगिक शेअर्स किंवा त्यावरील कोणत्याही भागामध्ये किंवा वर वारसा, शेअर, विक्री, गहाण, हस्तांतरण, अभिहस्तांकन, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, कुळवहिवाट, उप-कुळवहिवाट, कुळमुख्त्यारपत्र, धारणाधिकार, परवाना, प्रलंबित वाद, अग्रक्रयाधिकार, प्रभार, विश्वस्त, निर्वाह, सुविधाधिकार, भेट, मयत, अंत्यदान, अदलाबदल, ताबा किंवा भार, उत्तराधिकार, भोगवटा, कोणतेही समजुतीचे ज्ञापन, लिखित, कौटुंबिक तडजोड / व्यवस्था, लाभकारी हितसंबंध, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राटे / करार / वाटप किंवा अन्यकाहीच्या मार्गे कोणतीही मालकी, हक्क, नामाधिकार, मालमत्ता किंवा हितसंबंध असल्यास किंवा त्यांची दावेदारी असल्यास याद्वारे तशी लिखित सूचना दस्तावेजी पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना येथे खालील नमूद पत्त्यावरील त्यांच्या कार्यालयात सदर प्रकाशनाच्या तारखेपासून **दहा दिवसां**च्या आत कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास, कोणत्याही तशा व्यक्तींचे कोणतेही तसे दावे किंवा हक्क नाहीत असे गृहीत धरले जाईल आणि तसे दावे जर काही असल्यास त्यांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय माझ्या अशीलांच्या नावे सदर फ्लॅट/अपार्टमेंट आणि शेअर्सची विक्री आणि हस्तांतरण पूर्ण होईल आणि ते अस्तित्वात नाहीत/त्यागित आहेत असे समजले जाईल आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक नसतील.

परिशिष्ट

डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - ४०० ०३० येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या आणि शिवाजी नगर अशा ज्ञात मोठ्या लेआऊटचा उर्वरित भाग आणि वरळी विभागाच्या कॅडेस्ट्रल सर्व्हे क्र. ९९८ (भाग) आणि ९९९ (भाग) धारक मोजमापित अंदाजे ४५०० चौ. मी. किंवा तत्सम जमिनीच्या त्या सर्व भाग आणि विभागांवर बांधकामित होणाऱ्या **द वरळी शिव शाही को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** अशा ज्ञात सोसायटीच्या पुनर्वसन इमारत टॉवर ए मधील **फ्लॅट/अपार्टमेंट क्र. १३०४** (मोजमापित १०२५ चौ. फू. चटई क्षेत्रापेक्षा कमी नसलेले क्षेत्र इमारत क्र. ७ च्या जुन्या फ्लॅट क्र. ५ च्या बदल्यात वाटप करण्यात येईल) त्यासह कार पार्किंग स्पेसेस त्यासह सोसायटीद्वारे जारी दिनांक १४ फेब्रुवारी, १९९६ रोजीच्या **शेअर प्रमाणपत्र क्र. ५** अन्वये विभिन्न क्रमांक २१ ते २५ (दोन्ही एकत्रित) धारक प्रत्येकी रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) चे ५ (पाच) पूर्ण-भरणा शेअर्स.

सदर दिनांक १० एप्रिल, २०२४.

एमडीपी ॲण्ड पार्टनर्स
एमडीपी हाऊस,
१९, बँक स्ट्रीट क्रॉस लेन,
फोर्ट, मुंबई-४०००01.

एमडीपी ॲण्ड पार्टनर्स करिता
सही/-
(अशोक परांजपे)
व्यवस्थापकीय भागीदार

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. (मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक)
रिकव्हरी ॲण्ड राईट ऑफ डिपार्टमेंट, रिजन-II
पत्र व्यवहाराचा पत्ता : होरायझन बिल्डिंग, १ला मजला, रानडे रोड आणि गोखले रोड जंक्शन, गोखले रोड (उत्तर), दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.
फोन क्र. ०२२-२४४७६०१२/५७/५८

कब्जा सूचना (नियम ८(१) पहा) - स्थावर मिळकतीकरीता

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे कॉसमॉस को-ऑप. बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये **१२.०१.२०२४ रोजीस मागणी सूचना** निर्गमित करुन **कर्जदार/गहावटणदार- मे. मीता एंटरप्रायजेस** द्वारे त्याचे एकमेव मालक- १. श्री. शांतीलाल रानमल शाह, **सह-कर्जदार/गहावटणदार-** श्रीम. शिल्पा मुकेश शहा आणि **सह-कर्जदार-** १. श्रीम. गीता विजय शाह, २. श्री. हरकचंद रानमल शाह (मयत), ३. श्रीम. हंसाबेन हरकचंद शाह आणि ४. मीनाबेन रानमल शाह, **सह-कर्जदार/हमीदार-** श्री. विजय रानमल शाह आणि **हमीदार-** श्री. केशवजी भोजा गाडा यांना सूचनेत नमूद रक्कम **रु. ५,३८,२५,३२५.८३ (रुपये पाच करोड अडतीस लाख पंचवीस हजार तीनशे पंचवीस आणि त्र्याऐंशी पैसे मात्र) सह पुढील व्याज आणि प्रभाराची** परतफेड करण्यात सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगण्यात आले आहे. सदर मागणी सूचना **वर्तमानपत्र म्हणजेच न्यूज हब (इंग्रजी) आणि प्रात:काल (मराठी)** यांच्या ३०.०१.२०२४ रोजीसच्या मुंबई आवृत्तीमध्ये एक अधीन सेवा म्हणून प्रसिध्द झाली आहे.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार कंपनी द्वारे त्यांचे संचालक, हमीदार आणि गहाणदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार कंपनी द्वारे त्यांचे संचालक, हमीदार आणि गहाणदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **प्रत्यक्ष कब्जा** सदर ॲक्टच्या कलम १३ च्या उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये **०५ एप्रिल, २०२४** रोजी प्राप्त अधिकारांचा वापर करून घेतला.

तारण मत्तेच्या भरण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार कंपनी द्वारे त्यांचे संचालक, हमीदार आणि गहाणदार यांचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

विशेषत: कर्जदार कंपनी द्वारे त्यांचे संचालक, हमीदार आणि गहाणदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **कॉसमॉस को-ऑप. बँक लि.** च्या वरील नमूद रक्कम सह व्याज, परिव्यय आणि त्यावरील प्रभाराच्या भाराअधीन राहील.

स्थावर मिळकतीचे वर्णन (तारण मत्ता)

कार्यालय क्र. १०६, मोजमापित सुमारे १६.७२ चौ. मीटर्स (अंदाजे) म्हणजेच १८० चौ. फू. (बिल्ट-अप क्षेत्र) १ल्या मजल्यावर स्थित आणि **कार्यालय क्र. १०८,** मोजमापित सुमारे ९.७५ चौ. मीटर्स (अंदाजे) म्हणजेच १०५ चौ. फू. (बिल्ट-अप क्षेत्र) शांती मार्केटच्या १ल्या मजल्यावर स्थित, प्लॉटच्या बॅरेक क्र. १४ च्या विंग क्र. १ ते १४ वर बांधकामित, सी.टी.एस. क्र. २६१४ धारक, महानगरपालिका वार्ड क्र. ७, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत, तालुका आणि उप-नोंदणी जिल्हा उल्हासनगर, नोंदणी जिल्हा ठाणे, उल्हासनगर - ४२१ ००१.

दिनांक : ०५.०४.२०२४
ठिकाण : उल्हासनगर, ठाणे

सही/-
प्राधिकृत अधिकारी
सरफैसी ॲक्ट - २००२ अन्वये
दि कॉसमॉस को-ऑपरेटीव्ह बँक लि. करीता

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी)

ज्या अर्थी,

निम्नस्वाक्षरीकार **इंडियाबुल्स हाउसिंग फायनान्स लिमिटेडचे (CIN:L65922DL2005PLC136029)** सिक्योरिटाइजेशन ॲण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्योरीटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये प्राधिकृत अधिकारी आणि सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून स्पष्ट 60 दिवसांच्या आत **19.03.2024** रोजी सूचनेत नमूद केलेली आणि अधिक रक्कम **रू. 34,46,338.91 (रूपये चौतीस लाख सेहचाळीस हजार तीनशे अडतीस आणि एक्याण्णव फक्त)** साठी **कर्ज खाते क्र. HHLVRA00262558** या रकमेची परत फेड करण्याची दिनांक **19.03.2024** पासून ते प्रत्यक्ष भरणा करेपर्यंतची मागणी, सूचना कर्जदार **राजेश एम खोब्रागडे उर्फ राजेशकुमार मणिराम खोब्रागडे आणि पूर्णिमा राजेश खोब्रागडे उर्फ पूर्णिमा दुलीचंद अंबाडे** यांना कलम 13(12) सह सिक्योरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, 2002 चा नियम 3 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारात जारी केली.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार अपयशी ठरल्यामुळे याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, सदर कायद्याचे कलम 13 ची उप कलम (4) सह सिक्योरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, **2002** चा नियम **8** अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारात खाली वर्णन केलेल्या मालमतेचा निम्न स्वाक्षरीकाराने **ताबा 05.04.2024** रोजी घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे खबरदार करण्यात येते की, या मालमत्तेचे व्यवहार करू नयेत आणि कोणत्याही व्यवहारावर **इंडियाबुल्स हाउसिंग फायनान्स लिमिटेड** ची कर्ज आकारणी **रू. 34,46,338.91 (रूपये चौतीस लाख सेहचाळीस हजार तीनशे अडतीस आणि एक्याण्णव फक्त)** पुढील व्याज **19.03.2024** पासून प्रत्यक्ष भरणा करेपर्यंत लागेल.

कर्जदारांचे लक्ष्य कलम 13 चे उप-कलम (8) च्या मालमत्ता / मालमत्तेला मुक्त करण्यासाठी उपलब्ध वेळेकडे आकर्षित केले जात आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

इमारत क्र. 23, विनय युनिक इम्पेरिया, विंग-डी, पहिल्या मजल्यावर, फ्लॅट क्र. 106 ज्याचे चटई क्षेत्रफळ 405 स्क्वेअर फीट 37.62 स्क्वेअर मीटर्सच्या समतुल्य, खुली टेरेस मोजमाप 80 स्क्वेअर फीट 7.43 स्क्वेअर मीटर्सच्या समतुल्य, चटई क्षेत्र 36.50 स्क्वेअर फीट 3.39 स्क्वेअर मीटर्सच्या समतुल्य विशेष पण वापरण्यायोग्य मर्यादित अधिकार सहित, सेक्टर 7 मध्ये स्थित, गाव डोंगरे, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा ठाणे-401303, महाराष्ट्र .

सही/-

तारीख : **05.04.2024**
स्थळ : ठाणे

अधिकृत अधिकारी
इंडियाबुल्स हाउसिंग फायनान्स लिमिटेड

प्रपत्र क्र.१४
(रेग्युलेशन ३३(२) पहा)
रजि. ए/डी, दस्ती द्वारे न झाल्यास प्रकाशनाद्वारे

वसुली अधिकारी-I/II चे कार्यालय,
कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)
१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३

मागणी सूचना

द रिकव्हरी ऑफ डेब्टस अँड बँक्रप्ट्सी ॲक्ट, १९९३ ची कलम २५ ते २८ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम २ अन्वये
आरसी/१५४/२०२३
तामिळनाड मर्कंटाईल बँक लि.
विरुद्ध
रमेश कुलकर्णी आणि अन्य

प्रती,
(सीडी -१) श्री. रमेश व्ही. कुलकर्णी
श्री. प्रमोद माधवराव झांबेकर म्हणून देखील ओळखले जाणारे
पत्ता येथे, गजानन स्मृती, संजय जनरल स्टोअरच्या मागे,
डॉ. नेमाडे गल्ली, डोंबिवली (प), जि.- ठाणे.

१. याद्वारे अधिसूचित करण्यांत येते की, **ओए/५०४/२०१२** मध्ये पीठासिन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी३) यांनी पारित केलेल्या आदेशाने जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार **रु. १०,४३,५६६/- (रुपये दहा लाख त्रेचाळीस हजार पाचशे सहासष्ट मात्र)** ची **रक्कम ३०/०५/२०१२ पासून वसुली पर्यंत वार्षिक** १७.२५% **सरळ व्याज दराने** प्रलंबित आणि भविष्यातील व्याज व **रु. ३१,९३६/- (रुपये एकतीस हजार नऊशे छत्तीस मात्र)** च्या खर्चासह तुमच्याकडून (संयुक्तपणे आणि वेगवेगळे) येणे थकीत आहे.
२. तुम्हाला याद्वारे ह्या सूचनेच्या प्राप्तीच्या १५ दिवसांत वरील रकम प्रदान करण्याचे निर्देश देण्यात येते आहेत, कसूर केल्यास, रिकव्हरी ऑफ डेब्टस ड्यु टु बँक्स अँड फायनान्शिअल इन्स्टिट्युशन्स ॲक्ट, १९९३ व त्या अंतर्गत बनवलेले नियम यांच्या अनुषंगाने वसुली केली जाईल.
३. तुम्हाला याद्वारे सुनावणीच्या पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी तुमच्या मत्तांचे तपशील एका प्रतिज्ञापत्रावर घोषित करण्याचे आदेश देण्यांत येतात.
४. पुढील कार्यवाहीसाठी **१८.०४.२०२४ रोजी स.११.३० वा.** निम्नस्वाक्षरीकारांसमोर हजर होण्याचे आदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येतात.
५. वरील रकमे व्यतिरिक्त तुम्हाला खालील रकमा सुद्धा भराव्या लागतीलः
(ए) प्रमाणपत्र/निष्पादन प्रक्रियेच्या ह्या सूचनेनंतर तात्काळ सुरू होणाऱ्या कालावधी साठी देय असे व्याज
(बी) ही सूचना आणि वॉरंटस् च्या बजावणीच्या व थकबाकी रकमेच्या वसुलीकरिता केलेल्या अन्य सर्व उपाययोजनांच्या संबंधात आलेले सर्व खर्च, आकार आणि परिव्यय.

माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या २९/०२/२०२४ रोजी दिले.

वसुली अधिकारी-I
कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

केनरा बैंक Canara Bank सिंडिकेट Syndicate

एआरएम । शाखा, मुंबई, ३७, खसमलय, पाटकर हॉल समोर, न्यू मरीन लाईन्स, ठाकरसे मार्ग, मुंबई-४०००२० **वेब:** cb2360@canarabank.com
टेलि. ०२२-२२०६५४२५/३० **ई-मेल :** www.canarabank.com

विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचत सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, कॅनरा बँकच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा **सांकेतिक कब्जा** घेतला होता त्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेल्या खालील स्थावर मिळकती, **मे. वेनमित्र सिस्टम्स प्रोप- श्री. धनंजय व्यंकटेश कामठ (कर्जदार) आणि सौ. परीता धनंजय कामठ (हमीदार)** यांच्याकडून **कॅनरा बँक, एआरएम-II शाखेला रु. ९,५४,६१,७८६.७४ (रुपये नऊ कोटी चौपन्न लाख एकसष्ठ हजार सातशे शहाऐंशी आणि चौऱ्याहत्तर पैसे मात्र)** ०१.०४.२०२४ रोजीस अधिक पुढील व्याज आणि त्यावरील प्रभार) च्या वसुलीसाठी **१०/०५/२०२४** रोजी **'जसे आहे जेथे आहे' 'जसे आहे जे आहे' आणि 'जे काही आहे तेथे आहे'** तत्त्वाने विकल्या जातील.

अनु क्र.	मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत	इसारा अनामत रक्कम
१.	युनिट क्र. २१० सह लोफ्ट येथे २रा मजला, निर्माण इंडस्ट्रियल इस्टेट प्रीमिसेस सो लि न्यू लिंक रोड चिंचोली लिंक रोड मालाड पश्चिम	९७,२०,०००.००	९,७२,०००.००
२.	युनिट क्र. २१२ सह लोफ्ट येथे २रा मजला, निर्माण इंडस्ट्रियल इस्टेट प्रीमिसेस सो लि न्यू लिंक रोड चिंचोली लिंक रोड मालाड पश्चिम	१,०८,००,०००.००	१०,८०,०००.००
३.	फ्लॅट क्र. ए २०४, २रा मजला, ए विंग, अनमोल को-ऑप हाऊ सो प्लॉट बी ४, एस व्ही रोड, गोरेगाव पश्चिम मुंबई ४००१०४	२,११,००,०००.००	२१,१०,०००.००

इसारा अनामत रक्कम **०९/०५/२०२४ रोजी किंवा पूर्वी सायं. ५.०० वा.** पर्यंत जमा करायची आहे. सदर मिळकतीवरील कोणताही भार बँकेला माहित नाही.

राखीव किंमतीच्या १०% इअर रक्कम ०९/०५/२०२४ रोजी किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत **प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम १ शाखा, मुंबई यांच्या नावे डिमांड ड्राफ्टच्या मार्गे जमा करावी किंवा केनरा बँक एआरएम १ शाखा, मुंबई खाते क्र. २०९२७२४३४ आयएफएससी कोड सीएनआरबी०००२३६०** च्या खात्यात आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफरमार्फत जमा करावी आणि इतर दस्तावेज सेवा पुरवठादाराकडे ०९/०५/२०२४ रोजी किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत जमा करू शकता ज्या दस्तावेजांचा भरणा बँकेसह ०९/०५/२०२४ पर्यंत करण्यात येईल.

प्राधिकृत अधिकाऱ्यासह पूर्व वेळ ठरवून मिळकत निरीक्षणाची तारीख

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्ती करिता कृपया कॅनरा बँकेची वेबसाईट **(www.canarabank.com)** मध्ये दिलेल्या लिंक ''ई-लिलाव'' चा संदर्भ घ्यावा किंवा कोणत्याही कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत **डॉ. सीमा सोमकुवर, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम । शाखा, मुंबई (दूर. क्र.: (०२२) २२०६५४२५ /३०/ मोबा. क्र. ८६५५९६३४८९) किंवा सौ. सरस्वती सेल्वम मुख्य (मोबा. क्र. ९८२०८८६२४०) ई-मेल आयडी: cb2360@canarabank.com किंवा सेवा पुरवठादार मे. सी १ इंडिया प्रा. लि., उद्योग विहार, फेझ-२, गल्फ पेट्रोकेम इमारत, इमारत क्र. ३०१, गुरगाव, हरियाणा, पिन - १२२ ०१५ संपर्क व्यक्ती: श्री. भाविक पांड्या मोबा. क्र. ८८६६६८२९३७** (संपर्क क्र. +९११२४४३०२०२०/२१/२२/२३/२४, **maharashtra@c1india.com; Support@bankeauctions.com** येथे संपर्क साधावा.

दिनांक : ०६.०४.२०२४
ठिकाण : मुंबई

प्राधिकृत अधिकारी,
कॅनरा बँक, एआरएम-। शाखा

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

IDFC FIRST Bank

(पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडशी एकत्रित)
सीआयएन: एल६५११०टीएन२०१४पीएलसी०९७७९२
नोंदणीकृत कार्यालय : केआरएम टॉवर्स, ८वा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपट, चेन्नई-६०००३१
दू. : +९१ ४४ ४५६४ ४००० । फॅक्स : +९१ ४४ ४५६४ ४०२२

जाहीर सूचना
सोने लिलाव नि निमंत्रण सूचना

खालील नमूद कर्जदारांना आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड कडून त्यांनी घेतलेले सोने दागिने सापेक्ष पत सुविधेकरिता थकीत रक्कम प्रदान करण्यास सूचना जारी केलेली होती. कर्जदारांनी सुविधेअंतर्गत देय परतफेड करण्यास कसूर केल्याने आम्हाला १८/०४/२०२४ रोजीस तारण ठेवलेल्या सोने दागिन्याचा लिलाव करण्यासाठी भाग पडले आहे. सदर परिस्थितीमध्ये सदर लिलावामधून जर अधिक रक्कम प्राप्त झाल्यास सदर संबंधित कर्जदारांना परत देण्यात येईल आणि जर लिलावानंतर काही रक्कम कमी असेल तर उर्वरित रक्कम उचित कायदेशीर कारवाई मार्फत कर्जदारांकडून वसुल केली जाईल. आयडीएफसी फर्स्ट बँकला कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय लिलावातून पुढील खाते काढून टाकण्याचा अधिकार आहे. पुढे, आयडीएफसी फर्स्ट बँक कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय लिलावाची तारीख बदल करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

कर्ज खाते क्रमांक	ग्राहकाचे नाव	शाखेचे नाव
९७१९२६७७	अनिकेत मोहन गोगुलवार	नागपूर

लिलाव १८/०४/२०२४ रोजीस दु. १२.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत https://egold.auctiontiger.net मार्फत ऑनलाईन घेण्यात येईल.

सदर प्रकाशनाच्या द्वारे संबंधित कर्जदारांना याद्वारे ठरविलेल्या लिलाव तारखेपूर्वी सर्व व्याज आणि प्रभारासह परत मागितलेल्या सुविधेमधील रक्कम परतफेड करण्यास अंतिम सूचना आणि शेवटची संधी देण्यात येत आहे, कसूर केल्यास सोने दागिन्यांचा लिलाव करण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी की, जर वेळेच्या अभावामुळे त्याच दिवशी लिलाव पूर्ण न झाल्यास बँक त्याच अटी आणि शर्तींवर पुढील ७ दिवसांच्या आत गहाण ठेवेलेल्या सोने दागिन्यांचा पुर्नलिलाव करण्यात येईल. जर ग्राहक मयत व्यक्ती असल्यास लिलावाच्या संबंधित सर्व शर्ती त्यांच्या कायदेशीर वारसदारांना लागू असेल.

दिनांक : १०/०४/२०२४ ठिकाण: नागपूर

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, माझे अशील **श्री. प्रदीप सी. नाडकर** हे रिट्रीट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड., नोंद. क्र. **बीओएम/एचएसजी/३६२२-१९७२** ज्यांचा पत्ता येथे प्लॉट क्र. **३७-३८,** सारस्वत कॉलनी, अनसुया रोड, सांताक्रुझ - पश्चिम, मुंबई ४०००५४ (यानंतर **सदर सोसायटी** अशी उल्लेखित) चे सदस्य आहेत आणि तसेच सोसायटीच्या इमारतीच्या १ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १ (यानंतर **सदर फ्लॅट** असे उल्लेखित) चे धारक आहेत.

सदर सोसायटीने दिनांक **११ मे, १९७२** रोजीच्या वाटप पत्रान्वये सदर फ्लॅट त्यांचे प्रवर्तक **श्री. विठ्ठल वेंकटेश कामत आणि श्रीम. वासंती विठ्ठल कामत** यांना वाटप केला.

श्री. विठ्ठल वेंकटेश कामत आणि श्रीम. वासंती विठ्ठल कामत (१ले मालक) यांनी सदर फ्लॅटमधील त्यांचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध योग्य मोबदला आणि त्यातील नमूद अटी आणि शर्तींकरिता दिनांक १० जून, १९७२ रोजीच्या करारान्वये (यानंतर **सदर करार** असे उल्लेखित) **श्री. यश कोहली** (२रे मालक) यांना विकले.

सदर करार हा माझ्या अशीलांकडून घर बदलताना हरवला होता आणि त्यांनी दिनांक **०६.०४.२०२४** रोजी हरवलेले प्रमाणपत्र क्र. **०१२५/२०२४** च्या नोंदणींतर्गत सांताक्रुझ पोलीस स्टेशन, मुंबई यांना कळविले आहे की, घर बदलताना सदर मूळ करार गहाळ झाला आहे.

जर कोणालाही सदर मूळ करार सापडल्यास किंवा कोणत्याही व्यक्तीं / वित्तीय संस्था / बँका यांना सदर फ्लॅट किंवा त्यावरील कोणत्याही भागाविरोधात, मध्ये किंवा त्यावर वारसा, ताबा, विक्री, भाडेपट्टा, गहाण, प्रभार, भेट, विश्वस्त, धारणाधिकार, परवाना, सुविधाधिकार, निर्वाह, दस्तावेज/नामाधिकार विलेखांचा ताबा किंवा अन्यकाहीच्या मार्गे कोणतेही शेअर, हक्क, नामाधिकार, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास याद्वारे तसे निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय येथे कार्यालय क्र. बी/२८, तळ मजला, पटेल शॉपिंग सेंटर, चंदावरकर रोड, राज महाल हॉटेलच्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०००९२ येथे तसा दावा जर काही असल्यास त्याच्या सर्व पुरक दस्तावेजांसह सदर सूचनेच्या तारखेपासून **पंधरा (१५)** दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास, तशा व्यक्तीं / वित्तीय संस्था / बँका यांचे जर काही दावे असल्यास ते त्यागित आणि/किंवा परित्यागित मानले जातील.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १०/०४/२०२४

सही/-
ब्रिजेश आर. पाटील
वकील उच्च न्यायालय

जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, गांव मौजे कामण, तालुका वसई, जिल्हा पालघर येथिल सर्व्हे नं. १२४, हिस्सा नं. २, क्षेत्रे ४.११.४० हे. आर. चौ. मी., पो. ख. १.८४.०० हे. आर. चौ. मी. आकार रू. पै. ५.६५, हयापैकी क्षेत्र १९८९ चौ. मी. जमीन मिळकत श्री. स्वागत बिपीन संघवी हयांचे मालकी कब्जेवहीवाटीची व उपभोगाची असून सदर जमीन मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर जमीन मिळकतीवर कुणाही इसमाचा अथवा संस्थेचा वारसाहक्क, अधिकार, विक्री, हितसंबंध, दावा, गहाण, दान, तारण, भाडेपटटा, इत्यादी असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर १४ दिवसांचे आंत निम्नस्वाक्षरीकाराच्या आदीत्य होंडा सर्विस सेंटरच्या समोर, गोखिवरे, वसई पुर्व, ता. वसई जि. पालघर ४०१२०८ हया पत्यावर लेखी कळवावे अन्यथा कुणाचाही तसा हक्क हितसंबंध नाही असे समजून व्यवहार पुर्ण केला जाईल हयांची कृपया नोंद घ्यावी.

ॲड. राकेश नाना भोईर

जाहीर सूचना

जेम्स इम्पोर्ट - एक्स्पोर्ट, २५, तळ मजला, पारेख मार्केट, ३९, केनेडी ब्रिज, मुंबई - ४०० ००४ चे मालक वरील परिसर विक्री करण्यास प्रस्तावित आहेत. कोणीही व्यक्तीस सदर मिळकतीच्या संदर्भात किंव कोणत्याही भागासंबंधात सदर प्रस्तावित विक्रेत्याच्या हक्क, नामाधिकार किंवा हितसंबंधाच्या विरोधात किंवा वर किंवा मध्ये वारसा, हिस्सा, विक्री, गहाण, हस्तांतरण, भाडेपट्टा, परवाना, कुळवहिवाट, धारणाधिकार, प्रलंबित वाद, प्रभार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, भेट, दस्तावेज, मृत्युपत्रीत दान, देवाण घेवाण, ताबा किंवा बोजा किंवा अन्यकाही कशाहीच्या मार्गे कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास, सदर प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ कामकाजाच्या दिवसांत खाली दिलेल्या पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकारांना लेखी त्यासंबंधी सूचना देणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, असा दावा किंवा मागणी काही असल्यास, त्याच्या संदर्भाशिवाय सदर प्रस्तावित विक्रेता आणि आमच्या अशीलांदरम्यान प्रस्तावित व्यवहार पूर्ण केला जाईल आणि असा कोणताही दावा किंवा मागणी सर्व हेतू आणि उद्देशांसाठी सोडून दिली आणि /किंवा त्यागित केली असे मानण्यात येईल आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक नसेल.

गोपाळ शर्मा (सी.ए.)
२५, तळ मजला, पारेख मार्केट, ३९,
केनेडी ब्रिज, मुंबई - ४०० ००४
दिनांक : १०.०४.२०२४

PPFAS Mutual Fund

PPFAS Asset Management Private Limited
(Investment Manager for PPFAS Mutual Fund)
Registered Office: 81/82, 8th Floor, Sakhar Bhavan, Ramnath Goenka Marg, 230 Nariman Point, Mumbai - 400 021, Maharashtra, INDIA. **Tel.:** 91 22 6140 6555. **Fax:** 91 22 6140 6590. **Toll Free Number:** 1800-266-7790.
E-mail: mf@ppfas.com. **Website:** www.amc.ppfas.com **CIN No:** U65100MH2011PTC220623

NOTICE

Disclosure / Hosting of Half Yearly Portfolio of the Schemes of PPFAS Mutual Fund

All unit holders of PPFAS Mutual Fund are requested to note that in terms of Regulation 59A of SEBI (Mutual Funds) Regulations, 1996 and SEBI circulars issued in this regard from time to time, the Half Yearly Portfolio for the period ended March 31, 2024 of Schemes of PPFAS Mutual Fund have been hosted on the website of PPFAS Mutual Fund viz; www.amc.ppfas.com and on the website of Association of Mutual Funds in India, www.amfiindia.com. Investors can access / download the half yearly disclosure from the above-mentioned websites.

Investors are requested to take note of the same.

Further, investors can submit a request for a physical or electronic copy of half yearly portfolio for the period ended March 31, 2024 by any of the following modes at free of cost:

1. Email to us at mf@ppfas.com or
2. Contact us at Investor Helpline no. 1800-266-7790 or
3. Sending a written request at the Registered office address of the PPFAS Asset Management Private Limited as given below.

For PPFAS Asset Management Private Limited
(Investment Manager to PPFAS Mutual Fund)
Sd/-
Director

Place : Mumbai
Date : April 09, 2024

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

PPFAS MUTUAL FUND
There's only one right way©

फॉर्म नं. १४, (रेग्युलेशन ३३(२) बघा वे)
द्वारा नोंद. एडी/स्पीड पोस्ट, अफिक्शन, दास्ती

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मुंबई येथे
वित्त मंत्रालय, भारत सरकार
३रा मजला, एमटीएनएल भवन, स्ट्रॅण्ड रोड, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

मागणी सूचना

रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यु टु बँक्स अँड फायनान्शिअल इन्स्टिट्युशन्स ॲक्ट, १९९३ ची कलम २५ व २८ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम २ अन्वये सूचना

परि.:३
आरपी क्र. १५२ सन २०२३ **पुढील तारीख: ०७.०५.२०२४**

बँक ऑफ इंडिया ...अर्जदार
विरुद्ध
श्री. यशमान राजीव पाठक आणि इतर. ...प्रतिवादी

प्रति,
१. **श्री. यशमान राजीव पाठक,** फ्लॅट क्र.१०३, रॉयल पॅलेस, शास्त्री नगर लेन, चार बंगला, लोखंडवाला, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३.
२. **पूनम राजीव पाठक,** फ्लॅट क्र.१०३, रॉयल पॅलेस, शास्त्री नगर लेन, चार बंगला, लोखंडवाला, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३.

याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, ओ.ए. क्र. ४ सन २०१८ मध्ये पीठासिन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण - II, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशाने जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार **रु. ५१,२२,७०९.५९ (रुपये एकावन्न लाख बावीस हजार सातशे नऊ आणि एकोणसाठ पैसे मात्र)** ची रक्कम तुमच्याकडून येणे थकीत आहे. अर्जदार **रु. ५१,२२,७०९.५९ (रुपये एकावन्न लाख बावीस हजार सातशे नऊ आणि एकोणसाठ पैसे मात्र)** ची रक्कम सह **०७.०६.२०१७** पासून वसुली पर्यंत वार्षिक ११.०५% सरळ व्याज दराने प्रलंबित व्याज व पुढील व्याजासह सीडी यांच्याकडून वसुली करण्यास हक्कदार आहेत.

तुम्हाला याद्वारे ह्या सूचनेच्या प्राप्तीच्या १५ दिवसांत वरील रक्कम प्रदान करण्याचे निर्देश देण्यात येते आहेत, कसूर केल्यास, रिकव्हरी ऑफ डेब्टस ड्यु टु बँक्रप्टसी ॲक्ट, १९९३ व त्या अंतर्गत बनवलेले नियम यांच्या अनुषंगाने वसुली केली जाईल.

वरील रकमे व्यतिरिक्त तुम्हाला खालील रकमासुद्धा भराव्या लागतीलः
(ए) प्रमाणपत्र/निष्पादन प्रक्रियेच्या ह्या सूचनेनंतर तात्काळ सुरू होणाऱ्या कालावधीसाठी देय असे व्याज
(बी) ही सूचना आणि वॉरंटस् च्या बजावणीच्या व थकबाकी रकमेच्या वसुलीकरिता केलेल्या अन्य सर्व उपाययोजनांच्या संबंधात आलेले सर्व खर्च, आकार आणि परिव्यय.

पुढील कार्यवाहीसाठी **०७.०५.२०२४ रोजी दु. १२.२० वा.** निम्नस्वाक्षरीकारांसमोर हजर होण्याचे आदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येतात.

माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **१३ मार्च,** २०२४ रोजी दिले.

शिक्का

सही/-
एस.के. शर्मा
वसुली अधिकारी ,
डीआरटी-२, मुंबई

CANARA ROBECO

Canara Robeco Mutual Fund

Investment Manager : Canara Robeco Asset Management Co. Ltd.
Construction House, 4th Floor, 5, Walchand Hirachand Marg, Ballard Estate, Mumbai 400 001.
Tel.: 6658 5000 Fax: 6658 5012/13 www.canararobeco.com CIN No.: U65990MH1993PLC071003

NOTICE-CUM-ADDENDUM NO. 04

Change in the Key Personnel and Fund Management Responsibilities of certain schemes of Canara Robeco Mutual Fund:

The unitholders of Canara Robeco Mutual Fund ("CRMF") are requested to take note of following changes in key personnel and change in fund management responsibilities:

A. Changes in Responsibilities of Key Personnel:

The responsibilities of Mr. Amit Kadam shall stand revised as under with effect from April 10, 2024 ("Effective Date").

Mr. Amit Kadam, Assistant Fund Manager, a Key Personnel of Canara Robeco Asset Management Company Limited ("CRAMC") shall be redesignated as Fund Manager.

Accordingly, his designation appearing in Section 'Information on Key Personnel' of the Statement of Additional Information ("SAI") of the CRMF stands modified as above.

B. Changes in Fund Managers:

Consequent to above all Unitholders are requested to take note of the following change in the Fund Management Responsibilities of below schemes of CRMF with effect from April 10, 2024:

Scheme Name	Existing Fund Manager	New Fund Manager
Canara Robeco Focused Equity Fund	1. Mr. Shridatta Bhandwaldar (Fund Manager) 2. Mr. Amit Kadam (Assistant Fund Manager)	1. Mr. Shridatta Bhandwaldar (Fund Manager) 2. Mr. Amit Kadam (Fund Manager)
Canara Robeco Conservative Hybrid Fund	1. Mr. Avnish Jain (For Debt Portfolio) 2. Mr. Shridatta Bhandwaldar (For Equity Portfolio)	1. Mr. Avnish Jain (For Debt Portfolio) 2. Mr. Amit Kadam (For Equity Portfolio)

This addendum shall form an integral part of the Scheme Information Document ("SID") and Key Information Memorandum ("KIM") of the aforesaid Schemes and SAI of CRMF as amended from time to time. All other terms and conditions of the SID and KIM of the aforesaid Schemes and SAI of CRMF shall remain unchanged.

Unit holders are requested to visit www.canararobeco.com to claim their Unclaimed Redemption & Dividend/IDCW amounts and follow the procedure prescribed therein.

For and on behalf of Canara Robeco Asset Management Company Ltd.
(Investment manager for Canara Robeco Mutual Fund)

Date: 09-04-2024
Place: Mumbai

sd/-
Authorised Signatory

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

---

kotak®

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्र. : एल६५११०एमएच१९८५पीएलसी०३८१३७
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेस, वांद्रे (पू.), मुंबई -४०० ०५१, महा.
शाखा कार्यालय : अदमास प्लाझा, ४था मजला, १६६/१६, सीएसटी रोड, कोलीवेरी गाव, कुंची कुर्वे नगर, हॉटेल हरे कृष्णा जवळ, कलिना, सांताक्रूज (पू.), मुंबई - ४०००९८, महाराष्ट्र.

लिलाव नि विक्रीसाठी जाहीर सूचना

कृपया सदर सूचनेला एक नवीन सूचना म्हणून समजा जी सामान्यत: लोकांना आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांना दिली जात आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांकडे गहाण ठेवली आहे, ज्याचा **प्रत्यक्ष ताबा कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने** घेतला आहे, ती मालमत्ता **''जशी आहे जी आहे'', ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जे काही आहे''** या आधारावर विक्री करण्यात येईल. आमच्या स्थावर मिळकतीचे विक्री करिता निम्नस्वाक्षरीकारांद्वारे आमचे ई-लिलाव सेवा भागीदार, **मे. सी१ इंडिया प्रा. लि.,** म्हणजेच **www.c1india.com** च्या वेब पोर्टल मार्फत ऑनलाईन पद्धतीने बोली सादर करण्यासाठी प्रस्ताव मागवित आहे, त्याचे तपशील खाली दिले आहेत.

कर्ज खाते क्र.	**एचएफ३७६००८४५**	
कर्जदार, हमीदार, गहाणकारांचे नाव	**१. श्री. मोह. इसरार अन्सारी (कर्जदार) २. सौ. मदिना बेगम अन्सारी (सह-कर्जदार)**	
मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम [१३(२) सूचना तारीख आणि रक्कम]:	२६.०७.२०२१ आणि २३.०७.२०२१ रोजी अनुसार रु. ७४,५७,१०३.८२/- (रुपये चौऱ्याहत्तर लाख सत्तावन्न हजार एकशे तीन आणि पैसे ब्याऐंशी मात्र)	
स्थावर मालमत्तेचे वर्णन	**राखीव किंमत**	**इसारा अनामत रक्कम (इएमडी)**
मिळकत धारक फ्लॅट क्र. ७०२, ७ वा मजला, इमारत क्र. ०१ ई, ओशिवरा, तुलीप सीएचएस लि., पाटलीपुत्र नगर, न्यु लिंक रोड, मेगा मॉल, ओशिवरा, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई ४०० १०२, महाराष्ट्र चे सर्व ते भाग आणि विभाग.	**रु. ९८,००,०००/- (रुपये अठ्ठ्याण्णव लाख मात्र)**	**रु. ९,८०,०००/- (रुपये नऊ लाख ऐंशी हजार मात्र)**

स्थावर मिळकतीच्या तपासणीची तारीख	लिलावाची तारीख व वेळ
१९.०४.२०२४ स. ११.०० ते दु. १२.००	**३०.०४.२०२४ दु. ०२ ते दु. ०३**
बोली वाढविण्याची रक्कम	**प्रस्ताव/ इएमडी सादर करण्याची शेवटची तारीख**
रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र)	**२५.०४.२०२४ रोजी सायं. ५.०० पर्यंत**

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्ती :

(१) लिलाव बोली दस्तऐवजाच्या पुढील **अटी व शर्तीनुसार** आणि त्यामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आयोजित केला जातो. बोलीदार ई-लिलावासाठी ठेवलेल्या तारण मालमत्तेचे तपशील आणि बोली फॉर्म जो ऑनलाइन सादर करता येईल त्याकरिता आमच्या ई-लिलाव सेवा प्रदात्या **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** म्हणजे बोली दस्तऐवजांसाठी **https://www.bankeauctions.com** च्या वेबसाइटवर जाऊ शकतात.
(२) सर्व इच्छुक खरेदीदार/बोलीदार यांनी वर नमूद केलेल्या वेब पोर्टलवर उपरोक्त तारीख आणि वेळेला https://www.bankeauctions.com या नावाने त्यांचे नाव नोंदणी करणे आवश्यक आहे आणि ई-लिलाव मध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड विनामूल्य तयार करणे आवश्यक आहे.
(३) ई-लिलावावरील कोणत्याही चौकशी, माहिती, समर्थन, प्रक्रिया आणि ऑनलाइन प्रशिक्षणासाठी, संभाव्य बोलीदार आमच्या ई-लिलाव सेवा भागीदार विनोद चौहान, दूरध्वनी द्वारे. क्रमांक: +९१ ७२९११७११२४,२५,२६, **मोबाइल क्र.: ९८१३८८७९३१ आणि ई-मेल आयडी: delhi@clindia.com आणि support@bankeauctions.com** मार्फत **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** विभागाशी संपर्क साधू शकतात.
(४) प्राधिकृत अधिकाऱ्याच्या ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्ता/मालमत्तेमध्ये कोणताही भार नाही तथापि, इच्छूक बोलीदार बोली सादर करण्यापूर्वी वर नमूद केल्याप्रमाणे लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तेची आणि त्याच्या कागदपत्रांची किंवा इतर कोणत्याही तारीख आणि वेळेची आधी भेट घेऊन तपासणी करू शकतात आणि त्यांनी ई-लिलावात टाकलेल्या मालमत्तेचे नामाधिकार, आणि दाव्यांबाबत आणि मालमत्तेवर प्रभावित दावे/हक्क/देय/ बद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात **केएमबीएल** ची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व करत नाही. **केएमबीएल**ला ज्ञात किंवा अनोळखी सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्या/हक्क/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
(५) ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोलीदार वेब पोर्टल (https://www.bankeauctions.com) वर व्याजमुक्त परत करण्यायोग्य इसार रक्कम ठेव (इएमडी) भरण्याचे तपशील सादर/अपलोड करावे लागतील. वर नमूद केल्याप्रमाणे सुरक्षित मालमत्तेची पुणे/मुंबई येथे देय असलेल्या ''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'' च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे पॅन कार्ड, आधार कार्ड, निवासस्थानाचा पत्ता पुरावा, बोर्डाच्या ठरावाच्या स्वयं-साक्षांकित प्रतीसह वर नमूद केल्याप्रमाणे कंपनी आणि पत्ता पुरावा.

कर्जदार/गहाणदार/जामीनदार यांना **सरफैसी कायद्याच्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१)** अन्वये **याद्वारे १५ दिवसांची वैधानिक सूचना** देण्यात आली आहे. सदर सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत विद्यमान व्याज आणि खर्चासह वर नमूद केल्याप्रमाणे देय रक्कम, जर ते न दिल्यास सुरक्षित मालमत्ता नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विकली जाईल, वर इंग्रजी आणि स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांमधील विक्री सूचनांच्या प्रकाशनांमध्ये काही विसंगती आढळल्यास, अशा परिस्थितीत, इंग्रजी वृत्तपत्र स्थानिक वृत्तपत्राची जागा घेतील आणि ती अंतिम प्रत मानली जाईल, त्यामुळे संदिग्धता दूर होईल. कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणाऱ्यांनी बँकेची देय रक्कम, विक्रीच्या तारखेपूर्वी पूर्ण भरल्यास, लिलाव थांबवण्यास जबाबदार आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया आमच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** किंवा **कलेक्शन अधिकारी कन्ह्याशाम गुप्ता ८३६९१५६९०९ kanhyasham.gupta@kotak.com आणि/किंवा श्री. अशोक मोटवानी @ ९८७३७३७३५१, ईमेल आयडी : ashok.motwani@kotal.com,** वर नमूद केलेल्या बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात संपर्क साधावा.

विशेष सूचना : ई-लिलाव आमच्या सेवा प्रदाता मे. कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल) च्या वतीने **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** द्वारे पूर्व-निर्दिष्ट तारखेला आयोजित केला जाईल, बोलीदारांनी त्यांच्या स्वतःच्या घर/कार्यालये/ त्यांच्या बोलीच्या ठिकाणाहून त्यांच्या पसंतीनुसार राखीव किमतीच्या वर उद्धृत केले पाहिजे. इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि इतर सामानाची आवश्यकता बोलीदारांनी स्वतःच सुनिश्चित केली पाहिजे. कृपया लक्षात घ्या की इंटरनेट कनेक्टिव्हिटी **(कोणत्याही कारणामुळे असो)** अयशस्वी होणे ही केवळ बोलीदारांची जबाबदारी असेल आणि या अनपेक्षित परिस्थितीसाठी केएमबीएल किंवा **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** दोघेही जबाबदार असणार नाहीत. अशा आकस्मिक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी, बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी सर्व आवश्यक व्यवस्था/पर्यायी कराव्यात जेणेकरून ते अशा परिस्थितींना तोंड देऊ शकतील आणि तरीही ते यशस्वीरित्या ई-लिलावात सहभागी होऊ शकतील. तथापि, अशी कोणतीही गुंतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की, त्यांची बोली उद्धृत करण्यासाठी/सुधारणा करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत थांबू नये.

ठिकाण: मुंबई
दिनांक : ०८.०४.२०२४

सही/- प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड करीता

माननिय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठात
सी.ए (सीएए)/१८/एमबी-I/२०२४

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदी प्रकरणी
आणि
अपुर्वा नटवर पारिख आणि कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आणि आरएपीजी डेव्हलपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि क्रेडिटर्स यांच्यातील एकत्रित योजनेप्रकरणी

अपुर्वा नटवर पारिख आणि कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदींअंतर्गत समाविष्ट असलेली एक खाजगी कंपनी, जीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक यु६३०१०एमएच१९५९पीटीसी०११३८० असून नोंदणीकृत कार्यालय ४११बी, हेमुकलानी मार्ग, भक्ती भवन जवळ, चेंबुर, मुंबई — ४०००७१ महाराष्ट्र, भारत येथे आहे. **... कंपनी / अर्जदार कंपनी १**

अपुर्वा नटवर पारिख आणि कंपनी प्रायव्हेट लिमिटेडच्या ("कंपनी") असुरक्षीत क्रेडिटर्सच्या सभेची सूचना आणि जाहिरात

याद्वारे सूचना दिली जात आहे की कंपनी कायदा, २०१३ **("अधिनियम")** चे कलम २३० ते २३२ अंतर्गत अपुर्वा नटवर पारिख आणि कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आणि आरएपीजी डेव्हलपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि क्रेडिटर्स यांच्यातील संयुक्त योजनेचा **("योजना")** मुद्दा विचारात घेण्याच्या उद्देशाने, आणि योग्य वाटल्यास, फेरबदलासह किंवा त्याशिवाय मंजूरी देण्याच्या उद्देशाने कंपनीच्या असुरक्षीत क्रेडिटर्सची सभा **("सभा")** घेण्याचे आदेश दिनांक २० मार्च २०२४ **("न्यायाधिकरणाचा आदेश")** रोजी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठाने **("न्यायाधिकरण")** दिले आहेत.

न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या आणि त्यातील निर्देशानुसार आणि कायद्याच्या लागू तरतुदींचे पालक करुन, पुढील सुचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या असुरक्षित क्रेडिटर्सची सभा रविवार दिनांक १२ मे २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता (आयएसटी) ४११ बी, हेमुकलानी मार्ग, भक्ती भवन जवळ, चेंबुर, मुंबई — ४०००७१ येथे सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार योजनेला मंजुरी मिळवण्याच्या उद्देशाने आयोजीत केली जाईल.

योजनेची एक प्रत तसेच अधिनियमचे कलम १०२ सह वाचले जाणारे कलम २३० आणि इतर लागू तरतुदी आणि कंपन्या (समावेश, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम २०१६ **("सीएए नियम")** चे नियम ६ अन्वये निवेदनाची प्रत आणि प्रतिनिधित्व देण्याबाबतचा एक विहित फॉर्म सभेच्या सूचनेसोबत सर्व असुरक्षित क्रेडिटर्सना कंपनीच्या नोंदीनुसार त्यांच्या संबंधित ईमेल पत्त्यावर ईमेलद्वारे किंवा कंपनीकडे ज्या असुरक्षित क्रेडिटर्सचे ईमेल पत्ते उपलब्ध नाहीत त्यासर्व असुरक्षित क्रेडिटर्सना स्पीड पोस्टद्वारे किंवा कुरिअरद्वारे किंवा एअर मेलद्वारे किंवा नोंदणीकृत पोस्ट पोचपावतीद्वारे, परिस्थितीनुसार, पाठविण्यात आले आहे.

योजनेची एक प्रत तसेच अधिनियमचे कलम १०२ सह वाचले जाणारे कलम २३० आणि इतर लागू तरतुदी आणि सीएए नियमचे नियम ६ अन्वये निवेदनाची प्रत आणि प्रतिनिधित्व देण्याबाबतचा एक विहित फॉर्म सभेच्या सूचनेसोबत generaladministration@anpg.in या ईमेलवर ईमेल पाठवून तसेच ४११ बी, हेमुकलानी मार्ग, भक्ती भवन जवळ, चेंबुर, मुंबई — ४०००७१, महाराष्ट्र, भारत येथे असलेल्या कंपनीच्या कार्यालयात सकाळी १०:३० ते संध्याकाळी ६:०० यावेळेत सर्व कामकाजाच्या दिवसामध्ये सभेच्या तारखेपर्यंत विनामूल्य मिळवता येईल.

संबंधित सभेला उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्ती, वैयक्तिकरित्या किंवा प्रतिनिधित्वाद्वारे मतदान करु शकता, जर का विहित नमुन्यातील सर्व प्रतिनिधित्व कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या ४८ तासांपुर्वी जमा केल्या गेल्या असतील.

न्यायाधिकरणाने श्री मनीष जैन, वकील यांची सभेसाठी अध्यक्ष म्हणून आणि श्री मितेश शहा (आयसीएसआय क्रमांक एफ१००७०सीओपी १२८९१) यांची सभेसाठी छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे. वरनमुद केलेली योजना, जर असुरक्षित क्रेडिटर्सनी त्यांच्या सभेमध्ये मंजूर केले असेल, तर ते न्यायाधिकरणाच्या त्यानंतरच्या मंजुरीच्या अधीन असेल आणि नियामक किंवा इतर प्राधिकरणांच्या अशा इतर मान्यता, परवानग्या आणि मंजूरी आवश्यक असतील.

१० एप्रिल २०२४

सही/-
मनीष जैन
सभेसाठी नियुक्त केलेले अध्यक्ष